या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार २६ मे २०२४ | अंक१६७० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी
नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई
वडवणी केज परळी
पाटोदा शिरूर कासार
धारूर आष्टी माजलगाव
इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

# आयकर विभागाचा छापा, बंगल्यातील फर्निचर फोडून काढल्या नोटा, २६ कोटींची रोकड

**(नाशिक प्रतिनिधी)**

नाशिक शहरातील सराफ व्यवसायिकांकडे गेल्या दोन दिवसांपासून आयकर विभागाची छापेमारी सुरू आहे. नाशिकच्या कॅनडा कॉर्नर परिसरात असलेल्या एका ज्वेलर्सच्या दुकानावर तसेच त्यांच्या निवासस्थानावर आणि इतर ठिकाणी आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून 30 तासांपासून तपासणी सुरू आहे. एकाच ज्वेलर्सच्या दोन दालनांमध्ये तपासणी सुरु होती. नाशिक, नागपूर, जळगावच्या पथकातील 50 अधिकाऱ्यांची एकाच वेळी कारवाई केली. या छापेमारीत बंगल्यातील फर्निचर फोडून आयकर विभागाच्या



अधिकाऱ्यांनी नोटा काढल्या.पोलीस बंदोबस्तात छापेमारी नाशिक शहरात सराफ व्यवसायिक आणि बांधकाम व्यवसायिकांवर गुरुवारपासून आयकर विभागाकडून छापेमारी करण्यात आली. अचानक झालेल्या छापेमारीत कर बुडव्या व्यावसायिकांचे धाबे दणाणले. मागील काही दिवसांपासून कर बुडवे व्यवसायिक हे आयकर विभागाच्या रडारवर होते. त्यानुसार आयकर विभागाचे अधिकारी खासगी वाहनातून नाशिकमध्ये दाखल झाले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी छापेमारी सुरु केली. ज्या ठिकाणी छापेमारी सुरु होती, त्या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता. 90 कोटींच्या बेहिशोबी मालमत्ता नाशिकमध्ये बड्या सराफी व्यवसायिकावर आयकर विभागाने छापेमारीची बातमी शहरात सर्वत्र पसरली. त्यानंतर त्याची चर्चा सुरु झाली. आयकर विभागाच्या छाप्यात 26 कोटींची रोकड तर 90 कोटींच्या बेहिशोबी मालमत्तेची दस्तऐवज जप्त करण्यात आले. सलग तीस तास ही तपासणी करण्यात आली. आयकर चुकवल्याच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली. आयकर विभागाच्या छाप्यात मिळालेली रक्कम मनमाडमध्ये छापेमारी नाशिकप्रमाणे मनमाड शहरात आयकर विभागाने छापेमारी केली. मालेगावमधील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या एका उद्योगपतीच्या घरावर आणि कार्यालयावर प्राप्तिकर विभागाने छापा टाकला. ज्या उद्योगपतीच्या घर आणि उद्योगावर छापा टाकला त्याचे वेगवेगळे व्यवसाय आहेत. याबाबत आयकर विभागाकडून कमालीची गुप्तता पाळण्यात आली.

## परळीच्या तहसीलदारांना लोकसभा निवडणुकीत कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा भत्ता देण्यासाठी वेळ मिळेना

**बीड प्रतिनिधी अंकुश गवळी**

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना अनेक संकटांना सामोरे देत त्यांनी निवडणुका पार पाडल्या. बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील कर्मचाऱ्यांना मतदानाच्या ठिकाणीच त्यांचा जो भत्ता आहे, तो देण्यात आला. परंतु परळी तालुक्यातील तहसीलदारांना कर्मचाऱ्यांचा भत्ता देण्यासाठी आणखीनही वेळ मिळेना. काही कर्मचाऱ्यांनी निवडणुकीच्या दिवशीच तहसीलदारांना फोन करून भत्त्याविषयी विचारणा केली असता, त्यांनी दोन दिवस बँका बंद होत्या असे कारण दिले. दोन दिवसात आम्ही भत्ता तुमच्या खात्यावर पाठवू असं सांगितलं परंतु त्यानंतर पुन्हा संपर्क केला असता आठ दिवस लागतील याद्या करण्याचे काम सुरू आहे असेही सांगितलं. परंतु अद्याप पर्यंत भत्ता वाटप करण्यात आलेला नाही. तालुक्यातील इतर तालुक्यातील सर्व कर्मचाऱ्यांचा भत्ता मतदाना दिवशीच देण्यात आला. इतर जिल्ह्यातही मतदानाच्या दिवशीच कर्मचाऱ्यांचा भत्ता त्यांना नगदी देण्यात आला. मग परळीच्या तहसीलदारांना तो का देता आला नाही? असा प्रश्न पडणे साहजिकच आहे. परंतु एवढे दिवस होऊनही आणखीनही त्यांनी कर्मचाऱ्यांचा भत्ता त्यांच्या खात्यावर टाकलेला नाही. तेव्हा माननीय जिल्हाधिकारी श्रीमती दीपा मुधोळ मॅडम यांनी लक्ष घालून परळीच्या तहसीलदारांना कर्मचाऱ्यांचा भत्ता त्यांच्या खात्यावर लवकरात लवकर टाकण्यास सांगावे एवढीच कर्मचाऱ्यांची मागणी आहे.

## राष्ट्रीय समाज पक्ष विधानसभा स्वबळावर लढवणार , काशिनाथ नाना शेवते प्रदेशाध्यक्ष

**बीड जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर सर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील विधानसभेची आढावा बैठक संपन्न**

**बीड प्रतिनिधी**

राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेवजी जानकर साहेब यांच्या आदेशानुसार जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांची जयंती साजरी करण्यात आली. येणाऱ्या विधानसभेसाठी ही बैठक महत्त्वपूर्ण झाली आताच लोकसभेची रणधुमाळी कुठेतरी थांबली असता पक्षाच्या वतीने राज्यातील सर्व जागा स्वबळावर लढण्याचा निर्धार प्रदेश कार्यकारणी यांनी घेतला आहे, बोलताना श्री काशिनाथ नाना शेवते प्रदेशाध्यक्ष श्री माऊली नाना सलगर मुख्य महासचिव श्री अजित पाटील पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष श्री अण्णासाहेब मतकर जिल्हाध्यक्ष पक्ष जिल्हा परिषद पंचायत समिती व आमदारकी स्वबळावर लढणार आहे, यासाठी गाव तेथे शाखा आणि घर तेथे कार्यकर्ता ही संकल्पना राबविण्यात येणार आहे, वनबूथ टेन युथ ही संकल्पना राबवून राष्ट्रीय समाज पक्ष सर्व ताकतीनिशी बीड जिल्ह्यातील विधानसभा लढणार आहे ,माननीय महादेवजी जानकर साहेब यांच्या विचाराला प्रेरित होऊन असंख्य कार्यकर्ते राष्ट्रीय समाज पक्षासोबत काम करण्यास इच्छुक आहेत जानकर साहेबांनी त्यांच्या 30 40 वर्षातील त्यागातून हा पक्ष निर्माण करून वंचित उपेक्षित लोकांना अपेक्षित ठिकाणी घेऊन जाण्यासाठी त्यांनी निर्धार केलेला आहे त्यामुळे इथून




पुढे जिल्ह्यातील लोकांना माझा आव्हान आहे त्याच त्याच लोकांना पुन्हा पुन्हा निवडून देऊन आपण विकासापासून वंचित आहोत त्यामुळे आता कुठेतरी बदल करण्याची गरज आहे बदल करून राष्ट्रीय समाज पक्ष गोरगरिबांच्या मदतीला धावून जाऊन जिल्ह्यात क्रांती करू शकतो त्यामुळे जिल्ह्यातील मायबाप जनतेच्या आशीर्वाद आमच्यासारख्या सर्वसामान्यांच्या मुलांना दिला तर त्यांना सर्वसामान्याचे दुःखाची जाण असते आणि त्यामुळे विकास नक्की होईल काशीद कोचिंग क्लासेस च्या पुस्तकाचे प्रकाशन सर्व वरिष्ठांच्या हाताने करण्यात आले यावेळी उपस्थित.विष्णू दादा देवकते युवा मल्हार सेना . विक्रम बप्पा सोनसळे लोकसभा अध्यक्ष. परशुराम काशीद विद्यार्थी जिल्हाध्यक्ष. तुषार उंबरे युवक जिल्हाध्यक्ष. साईनाथ विग्ने, जिल्हा उपाध्यक्ष. प्रेम धायगुडे जिल्हा उपाध्यक्ष. माऊली मार्कड विधानसभा अध्यक्ष बीड .किरण डोळस जिल्हाध्यक्ष महिला . पाराजी मोठे ज्येष्ठ नेते. शिवराम शिरगिरे युवा नेते .भावले साहेब. बालाजी सातपुते तालुकाध्यक्ष गेवराई. शाम महानोर तालुका अध्यक्ष शिरूर .रतन भोंडवे तालुका अध्यक्ष पाटोदा. कल्पेश भोंडवे तालुका युवक अध्यक्ष .नितीन शिंदे कामगार कर्मचारी तालुकाध्यक्ष . संतोष शेजवळ युवा नेते .अमर वाघमोडे .अंकुश गवळी पत्रकार .अशोक हत्ते. कृष्णा धापसे .अविनाश काकडे. गेवराई शहराध्यक्ष सचिन हातागळे .खताळ विकास तालुका उपाध्यक्ष पाटोदा. उपळकर दादा. जाधव राजाराम. इतर सर्व पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

## अहिल्यामाई होळकर यांच्या जयंती निमित्त व माता रमाईच्या स्मृती दिनानिमित्त बामसेफचे एक दिवसीय प्रशिक्षण शिबिर

**प्रशिक्षक म्हणून डी. आर. ओव्हाळ यांची उपस्थिती**

**प्रतिनिधी/बीड**

अहिल्यामाई होळकर यांच्या जयंती निमित्त व माता रमाईच्या स्मृती दिनानिमित्त बामसेफच्या वतीने बीड शहरात हॉटेल गोल्डन चॉईस येथे उद्या सकाळी दहा ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत एक दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले असून प्रशिक्षक म्हणून डी. आर. ओव्हाळ यांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती बामसेफचे वरिष्ठ कार्यकर्ते मधुकर काळे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. रविवारी सकाळी दहा वाजता एक दिवसीय प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन हाशमी सय्यद शफीक अहमद यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी अंकुश निर्मळ, अमर ढोणे, ॲड.



सत्यनारायण ढाका, प्रा. बालाजी बोडखे, ॲड. राजू शिंदे, दत्ता सुरवसे, भीमराव कुटे, भाई मोहन गुंड, कांताबाई डी. जोगदंड, ॲड. भगवान कांडेकर, ॲड. चंद्रवधन जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहील. बीड जिल्ह्यातील सर्व बहुजन समाजातील नागरिकांनी या एकदिवसीय प्रशिक्षण शिबीराला बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बामसेफ शहर युनिटच्या वतीने करण्यात आले आहे.

## बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यावर गुन्हे दाखल करा.. भाई अड.नारायण गोले पाटील

माजलगाव प्रतिनिधी बीड जिल्ह्यात बियाणांच्या कंपन्या आणि त्यांचे अधिकृत विक्रेते यांनी आपसात संगणमत करून बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला असून शेतकऱ्यास चढ्या भावाने बियाणे विक्री करण्याचा कुटील डाव प्रशासनातील कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष घालून हाणून पाडावा यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जिल्ह्यातील कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना संपर्क साधून विनंती केलेली आहे परंतु कृषी विभागातील काही अधिकारी जाणीवपूर्वक कंपन्या आणि अधिकृत विक्रेते यांच्या कुटील डावाकडे डोळे झाक करण्याची शक्यता असल्यामुळे शेतकरी बांधवांनी सतर्क राहून प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून होणाऱ्या लुटीची माहिती द्यावी जर प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी सहकार्य करत नसतील तर शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्याकडे चढ्या भावाने विक्री करणाऱ्या अधिकृत विक्रेत्याच्या तक्रारी भ्रमनध्वनी क्र. ८४५९४९०८५० वर करण्याचे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी केले असून कृषीमंत्र्याच्या जिल्ह्यातच जर शेतकऱ्याची लुट होत आहे

# धूत कन्या विद्यालयाने राखली यशाची परंपरा

**सुनिल झिंजूर्डे पाटील**

शहरातील श्रीमती राजाबाई माधवलालजी धूत कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. याही वर्षी १२ वीच्या परीक्षेत विज्ञान शाखेचा निकाल १०० तर कला शाखेचा ९७ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेच्या एकूण १३ विद्यार्थीनी परीक्षेस बसल्या होत्या. कु. अश्विनी पानकडे या विद्यार्थिनीने ८९ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. तर कु. पूजा मोहिते ही (७१) द्वितीय, वैष्णवी बोकसे (६५) तृतीय क्रमांक मिळविले. दरम्यान, कला शाखेच्या एकूण ५२ विद्यार्थिनी परीक्षेस बसल्या होत्या. त्यात कु. शिरसाट शीतल ही विद्यार्थिनी प्रथम आली असून तिला ८५ टक्के गुण मिळाले आहेत. तर कु. माळवे सविता (८२), झिंजूर्डे साक्षी हिला ८२.१७ टक्के गुण मिळाले आहेत. विशेष प्राविण्यासह ६ प्रथम







श्रेणीत ३८ व द्वितीय श्रेणीत १६ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत. विद्यालयातील सर्व यशस्वी विद्यार्थिनी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिकांचे संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार राजकुमार धूत, अक्षय धूत, शालेय समिती अध्यक्ष सुशीलकुमार मंत्री, सुकुमार मंत्री, राजेंद्र सरोवर, संतोष भालेराव, प्रवीणकुमार सोमाणी, शालेय समिती सदस्या तृप्ती मंत्री, मुख्याध्यापिका श्रीमती बेंद्रे, संजीवनी पर्यवेक्षिका विदुला शास्त्री आदींनी अभिनंदन केले आहे.

## संपादकीय

### आगळीवेगळी व्यक्तीमत्वे- (लेखमाला)

### श्रीनिवास गडकरी

१९८२ ते २००९ पर्यंत आम्ही खोपोली येथे वास्तव्यास होतो. अनेक स्थानिक साहित्यिक कार्यक्रमांना आम्ही तेव्हा उपस्थित रहात असू. पेण, पनवेल, कर्जत, वाशी, उरण, अलिबाग, माणगाव, हरिहरेश्वर या ठिकाणी गेलो आहोत. १९९६ मध्ये मराठी साहित्य मंडळ, पेण तर्फे जिल्हास्तरीय दो दिवसीय साहित्य संमेलन झाले. या मंडळात प्रकाशक करंदीकर, कादंबरीकार विलास फडके, पत्रकार श्रीनिवास गडकरी आदि दिग्गज मंडळी होती. अतिशय उत्तम प्रतिसाद जिल्ह्यातील साहित्यिक वर्गाचा मिळाला. या संमेलनाचे सूत्रसंचालन श्री. श्रीनिवास गडकरी यांनी अतिशय बहारदार केले. या संमेलनात कवींसाठी एक आगळीवेगळी चित्र काव्य स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये मी उत्स्फुर्तपणे स्पर्धक म्हणून भाग घेतला होता. या स्पर्धेचे ज्येष्ठ कवी ए के शेख आणि अन्य मान्यवर परिक्षक होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी लोकप्रिय कवी, संगीतकार मा. यशवंत देव होते. माझ्या कवितेला यात प्रथम क्रमांक मिळाला.माझ्यासाठी तो अतिशय आनंदाचा क्षण होता. मा. यशवंत देव यांनी मला मंचावर त्या कवितेचे पुन्हा सादरीकरण करण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी लोकप्रिय कृषीवल दैनिकासह जिल्ह्यातील वृत्तपत्रांनी त्या कवितेस, वृत्तास ठळक प्रसिद्धी दिली. मा. श्रीनिवास गडकरी यांची तिथे तेव्हा ओळख झाली. आणि परिचयाचे मैत्रीत रूपांतर झाले. श्रीनिवास गडकरी म्हणजे एक अतिशय लाघवी, हसतमुख व्यक्तीमत्व. त्यांचे मूळ गावं रोहा ,रायगड. त्यांचे आई वडील तिथे असतात. ते नोकरी निमित्त तीस वर्ष पेण मध्ये होते. आता पुण्यात बावधन येथे स्थायिक झालेत. त्यांनी सिंडीकेट बँकेत पस्तीस वर्ष नोकरीं केली. जानेवारी २०२० ला ते सेवा निवृत्त झाले. मी कॅनरा बँकेत कोळखे शाखेत होतो. आमची दांडफाटा, पनवेल येथे भेटी होत. आता तर सिंडिकेट बँक सरकारने कॅनरा बँकेत विलीनीकरण केल्याने आम्ही एकाच बँकेत सेवानिवृत्ती नंतर आलो. लोकसत्ता, साप्ताहिक चित्रलेखा व मुंबई तरुण भारत चा वार्ताहर म्हणून अनेक वृत्तपत्र व मासिकांतून विपुल लेखन तसेच सदर लेखन त्यांनी केले. त्यांची एकूण पंचविस पुस्तके प्रकाशित असून त्यातल्या काहींना पुरस्कार मिळाले आहेत. एकूण तीन पुस्तकांना शासकीय शिफारस करण्यात आली त्यांच्या प्रत्येकी पाच आवृत्या प्रसिद्ध. सध्या निवृत्ती नंतर विपुल प्रमाणात काव्य लेखन. कवितेचे सर्वच प्रकार त्यांनी हाताळले आहेत. ते अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते आहेत. नोकरीं निमित्त पातळगंगा ब्रांच ला बदलून आले. तेव्हा hoc च्या टाउनशिप मधेच राहात होते. तेव्हा त्या परिसरात इंडस्ट्रीज मुळे सुशिक्षितांची वस्ती मोठी होती. तीही बहुभाषिक. त्यांनी "प्रेरणा" नावाची एक संस्था स्थापना केली. या संस्थेतर्फे मग दर वर्षी मोठा कला आणि क्रीडा महोत्सव भरे.

# दुहेरी व्याज वसुली करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर संघटित गुन्हेगारी कायद्यान्वये कारवाई करावी.

## शेतकरी संघटनेचे कालिदास आपेट यांची मागणी

**अंबाजोगाई जि.बीड :-** नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांकडून दुहेरी व्याज वसुली करणाऱ्या बँक आहे अधिकाऱ्यांवर संघटित गुन्हेगारी कायद्यान्वये कारवाई करावी.अशी मागणी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्याकडे केली आहे. पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 'शून्य' टक्के व्याज दराने कर्ज पुरवठा करावा म्हणून महाराष्ट्र सरकारने 5 जुलै 2010 रोजी परिपत्रक जारी केले. बीड जिल्ह्यातील राष्ट्रीयीकृत, ग्रामीण, खाजगी बँकांच्या अधिकाऱ्यांनी परिपत्रकाचे उल्लंघन करून शेतकऱ्यांकडून दरवर्षी 12 ते 13% व्याज दराने वसुली केली.तसेच राज्य व केंद्र शासनाच्या डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेतूनही व्याजाची वसूली केली आहे. ही बाब लक्षात येताच शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी बीडचे जिल्हा उपनिबंधक



सहकारी संस्था यांच्याकडे तक्रार केली.तक्रारीची दखल घेऊन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-1 यांना लेखा परीक्षण करण्याचे आदेश दिले. लेखापरीक्षक वर्ग-1 यांनी जिल्ह्यातील बँक अधिकाऱ्यांनी दुहेरी व्याज वसुली केल्याचा अहवाल सादर केला. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे राष्ट्रीयीकृत, ग्रामीण, खाजगी बँकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी शिफारस केली आहे.तसेच सहकार आयुक्त पुणे यांनीही कारवाईची शिफारस केली आहे. तरी बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी बँक अधिकाऱ्यांवर संघटित गुन्हेगारी कायद्यान्वये फौजदारी कारवाई करावी अशी मागणी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केली निवेदनात केली आहे.निवेदनावर शेतकरी संघटनेचे धारुर तालुका प्रमुख राधाकिशन गडदे, गणेश चौरे, कुलदीप करपे यांच्या सह्या आहेत.

# बीएड अभ्यासक्रमाला अधिकचे प्रवेश

## दुर्लक्ष कुणाचे? महाविद्यालयाला २४ लाख २० हजारांचा दंड

**छ.संभाजीनगर/प्रतिनिधि** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची सलग्न अध्यापक महाविद्यालयाची प्रवेश क्षमता कमी केल्यानंतरही संबंधित महाविद्यालयात पूर्व प्रवेश क्षमतेप्रमाणे प्रवेश झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे जालना जिल्ह्यातील वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालयाबाबत हा प्रकार घडला विद्यापीठाने महाविद्यालयाला याप्रकरणी २४,२०,००० रुपयांचा दंड ठोठावला नेमका दोष कुणाचा याचा शोध घेण्याऐवजी विद्यापीठाने दंड ठोठावला अशी चर्चा विद्यापीठात आहे तत्कालीन कुलगुरू डॉ प्रमोद येवले यांनी सलग्न ३९४ महाविद्यालयाचे अकॅडमी ऑडिट केले पायाभूत सुविधा पात्र शिक्षक नसल्याने बहुतांशी महाविद्यालयावर कारवाई केली अनेक महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ५०% कमी केले वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालयाचे २०२४-२५ मध्ये प्रवेश क्षमता ५० टक्क्यांनी कमी केली परंतु असे असताना महाविद्यालयात अधिकचे प्रवेश झाल्याचे समोर आले अध्यापक अभ्यासक्रमाचे प्रवेश बीएड राज्य सामायिक प्रवेश परीक्षा असेल द्वारे सिटी सेल होतात प्रवेश प्रक्रियेसाठी सीईटी सेल महाविद्यालयाकडून सलग्रित विद्यापीठाची ना हरकत प्रमाणपत्र एनओसी घेतात विद्यापीठाने प्रवेश क्षमता कमी केल्यानंतरही महाविद्यालयाकडे पूर्वीच्या प्रवेश क्षमतेप्रमाणे प्रवेश झाले. सीईटीतील गुणांप्रमाणे राज्यातील विविध भागातील मुलांनी प्रवेश संबंधित महाविद्यालयात घेतले विद्यार्थी प्रवेशित झाले तासिकांना आले दुसरीकडे विद्यापीठाकडून सत्र परीक्षेसाठी ची प्रक्रिया सुरु झाली आणि हा प्रकार लक्षात आला रीतसर प्रवेशित होऊनही विद्यार्थ्यांना सत्र परीक्षा देता आली नाही चर्चा सुरु झाल्यानंतर विद्यापीठ प्रशासन खडबडून जागे झाले आणि आता संबंधित महाविद्यालयाला २४ लाख २०हजाराचा दंड ठोठावला, दंड भरला तर पुढील सत्रात परीक्षा घेतली जाईल असे सांगण्यात येते आता हे प्रकरण व्यवस्थापन परिषदेसमोर जाण्याची शक्यता आहे

? महाविद्यालयास दंड शैक्षणिक वर्ष २०२३- २४ करिता बीएड प्रथम वर्ष प्रवेश क्षमता पूर्वक करणेबाबत आपल्या महाविद्यालयाने संदर्भ ६ नुसार विनंती केले त्याअनुषंगाने संदर्भ ७ अन्वेय अधिष्ठाता मंडळाच्या ४ मे २०२४ च्या बैठकीत प्रस्ताव क्रमांक दोन नुसार मंजूर ठरावानुसार आपल्या महाविद्यालयास अतिरिक्त ५५ प्रवेश केल्याबद्दल प्रति विद्यार्थी ४४ हजार रुपये (दोन वर्षाचा अभ्यासक्रम) वर्षाकरीता असे एकूण २४ लाख २० हजार रुपये एकरकमी दंड आकारून प्रवेश नियमित करणे बाबत व्यवस्थापन परिषदेचे शिफारस करणे बाबत ठराव घेण्यात आला आहे त्यानुसार दंड विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागास ऑनलाईन पद्धतीने भरणा करून सदर भरणा केल्याची पावती वित्त व लेखा विभागाकडून प्रमाणित करून शैक्षणिक विभाग यांना सागर करावी यानंतरच विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागास पुढील कारवाई करण्याबाबत कळविण्यात येईल



आम्ही अतिरिक्त प्रवेश दिले नाहीत सिईटी सेल द्वारे प्रक्रिया झाली तेव्हा पात्र शिक्षक नसल्याचे कळविले, विद्यापीठाने आमची प्रवेश क्षमता कमी केली आहे आम्ही शिक्षक भरतीसाठी नियमाप्रमाणे जाहिरात दिली याच दरम्यान सिटी सेल करूनही प्रक्रिया सुरू झाली होती आम्हाला विद्यापीठाने दिलेले सलगणीकरण २०२५ पर्यंतचे होते त्या आधारावर शंभर क्षमतेप्रमाणे अलोटमेंट झाले आता परीक्षा अर्ज भरताना विद्यापीठाने अधिक विद्यार्थी असल्याचे सांगत सत्र परीक्षेस बसण्यास मज्जाव केला आता या विद्यार्थ्यांची रक्कम भरल्यानंतर पुढील सत्रात दोन्ही सत्रांची परीक्षा होईल ,


**डॉ अनंत चौधरी**
**प्राचार्य वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय जालना**

अधिष्ठाता मंडळाकडून याबाबतचा प्रस्ताव आला आहे मला अधिक ची माहिती नाही परंतु प्रवेश कमी केल्याचे महाविद्यालयाला कळवले होते हे प्रवेश आपल्या स्तरावरून नव्हे तर सीईटी सेल करते महाविद्यालयाने सेलला योग्य माहिती कळविली की नाही? हे पहावे लागेल आम्ही दंड केला आहे

**डॉ वाल्मीक सरवदे**
**प्र-कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**

# कर्मवीर अड.एकनाथराव (जिजा) आवाड यांच्या स्मृतीदिनानिमित्त अंबाजोगईत २६ मे रोजी राज्यस्तरीय विद्रोही कार्यकर्ता पुरस्कार वितरण व व्याख्यान

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)** शोषित, पिडीत व उपेक्षितांच्या न्याय हक्कासाठी शासन, प्रशासन व प्रस्थापितांच्या विरोधात बंड करून सर्वसामान्य व्यक्तींना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्य झिजवणारे कर्मवीर ऍ़ड.एकनाथराव (जिजा) आवाड यांच्या स्मृतीदिनानिमित्त महाराष्ट्रात उपेक्षित माणसांच्या न्याय हक्कासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्याला प्रेरणा मिळावी. यासाठी युवा प्रतिष्ठान, अंबाजोगाईच्या वतीने समाजात प्रबोधन करणारे, धम्म चळवळ गतीमान करून योगदान देणारांना हा पुरस्कार दिला जातो. पुरस्काराचे हे ८ वे वर्ष आहे. कर्मवीर ऍ़ड.एकनाथराव आवाड राज्यस्तरीय विद्रोही कार्यकर्ता पुरस्कार-२०२४ चे वितरण व मान्यवरांचे व्याख्यान रविवार, दि.२६ मे २०२४ रोजी आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ.विजय कुमठेकर (जालना) तर यावेळी मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.डॉ.मिलींद आवाड (जे.एन.यु.दिल्ली) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या प्रसंगी सचिन बगाडे (पुणे) यांना राज्यस्तरीय विद्रोही कार्यकर्ता पुरस्कार - २०२४ देवून सन्मानित करण्यात येणार आहे. या प्रसंगी सत्यशोधक समाज महासंघाचे अध्यक्ष डी.एस. नरसिंगे, सामाजिक कार्यकर्ते आर.डी.जोगदंड, दत्त सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रशांत दहिफळे, स्वप्नपूर्ती सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष शितल लांडगे (केज), भारतीय सत्यशोधक महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत शिंदे,



ल.सा.क.चे संस्थापक सदस्य नरसिंग घोडके हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अंबाजोगाई येथे रविवार, दि.२६ मे रोजी दुपारी २ वाजता दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, पत्रकार भवन, नगरपरिषद सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी या कार्यक्रमासाठी अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन युवा प्रतिष्ठाणचे अध्यक्ष व आयोजक अशोक पालके, संतोष नरसिंगे, नकेश कांबळे, धीमंत राष्ट्रपाल, हनुमंत गायकवाड, अविनाश हजारे, नितीन होलबोले, महेंद्र कांबळे, नितीन वाघमारे, दत्ता पालके, हनुमंत रणदिवे, बळीराम उपाडे, रेखा सरवदे, महेश जोगदंड, दशरथ कांबळे, दिपक पालके, राम जोगदंड, प्रशांत भालेराव, प्रदीप कांबळे, सुंदर खाडे, दिलीप पालके, अरूण शिंदे, किशोर वाघमारे, मारूती मस्के, काशिनाथ कांबळे, अशोक ढगे, विवेक जाधव आदींनी केले आहे.

# लोहा- कंधार मतदारसंघातील राजकीय मक्तेदारी संपुष्टात आणून घराणे शाहीला त्यांची जागा दाखवा -शिवसेना संघटक एकनाथ पवार

**नांदेड प्रतिनिधी**

नांदेड : लोहा-कंधार मतदार संघातील घराणेशाहीचा अस्त जवळ आला असून त्याचा पहिला धक्का त्यांना ४ जून च्या नांदेड लोकसभेच्या निकालामधून बसणार आहे. त्यानंतर लगेच विधानसभा व जि. प. व पं. समितीच्या निवडणूका एकापाठोपाठ लागणार आहेत. त्यासाठी शिवसैनिकांसह शिवसेना पदाधिका-यांनो कंबर कसून कामाला लागा व लोहा - कंधार मतदार संघाला दाजी - भावजी च्या घराणेशाहीचा लागलेला कलंक पुसून टाका व माननीय पक्षप्रमुख ऊद्धवजी ठाकरे यांचे हात बळकट करा. शिवसेना ऊद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मशाल हाती घेऊन लोहा - कंधार मध्ये पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा फडकऊया. असे अवाहान शिवसेना महाराष्ट्र राज्य संघटक एकनाथ दादा पवार यांनी मारतळा ता. लोहा येथे उमरा सर्कल च्या पदाधिका-यांच्या बैठकीमध्ये केले. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख संजय पाटील ढेपे विधानसभा प्रमुख साहेबराव पाटील काळे, तालुकाप्रमुख संजय पाटील ढाले युवा सेना उप जिल्हाप्रमुख दिगंबर पाटील इंगोले, युवासेना जिल्हा संघटक योगेश नंदनवनकर, किसान सेना



तालूकाप्रमुख जनक जाधव, उपतालुका प्रमुख संतोष वडवळे,गणेश सोरगे,हणमंत कदम यांच्यासह उमरा सर्कल मधील उमरा, जोमेगाव, धनंज बु., धनंज खु.,कौडगाव, कामळज, येळी, हातणी, वाका, डोनवाडा, सुगाव, हिंदोळा, कर्माळा, पिंपळदरी, डोलारा, गोळेगाव, वाळकी बु., वाळकी खु., मारतळा, कापसी बु. व कापसी खु. इत्यादी गावचे शाखाप्रमुख व प्रमुख पदाधिकारी व बुथप्रमुख उपस्थितीत होते.

## आधुनिक यंत्रामुळे पाटा - वरवंटाचे महत्व होतेय कमी

**कुडूत्री/प्रतिनिधि**

पूर्वीच्या काळी स्वयंपाक घरामध्ये पाटा वरवंट्याला खूप मोठे महत्त्व होते. पण जसजशी आधुनिक युगात यंत्रे येऊ लागली तसतसे जुन्या वस्तूंचे महत्त्व कमी होत आले. स्वयंपाक घरात ठेचण्यासाठी व रगडण्यासाठी लागणारा पाटा वरवंटा आता त्याचे महत्त्व कमी झाले आहे.



पूर्वीच्या काळी घरामध्ये डाळीचे पुरण, मसाला अन्य वस्तू ठेचण्यासाठी व रगडण्यासाठी दगडापासून तयार झालेला पाटा - वरवंटा वापरला जात होता. पण सध्याच्या काळात या गोष्टी करण्यासाठी मिक्सर व विविध यंत्रे आल्याने त्याचे महत्त्व कमी होत आहे.

पाटा म्हणजे एक पंचकोनी व एक दंड गोलाकार आकाराचे दगडी भाग याच्या साह्याने चटणी व जेवणातील पदार्थ तयार केले जात. आजही वडार बेलदार लोक मोठ्या प्रमाणात पाटे वरवंटे तयार करतात पण त्यांची मागणी आजच्या युगात कमीच आहे.

आधुनिक यंत्रापेक्षा पाटा-वरवंटा वापरून बनवलेली चटणी किंवा अनेक पदार्थ लागत गोड लागतात व बारीक ही होतात. ही पाटा वरवंट्याची खास खासियत आहे.

# नाशिकचा पारा चाळीशी पार दहा वर्षाचे रेकॉर्ड ब्रेक

**नाशिक प्रतिनिधि**

यंदा नाशिकने गेल्या दहा वर्षातील सरासरी तापमानाचा पारा ओलांडल्याने राज्यातील सर्वाधिक उष्ण १५ जिल्ह्याच्या यादीत नाशिकचा समावेश झाल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून सांगण्यात आले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग आपल्याकडे दहा वर्षाच्या सरासरी तापमानाची नोंद ठेवत असते. त्यानुसार महाराष्ट्राचे सरासरी तापमान ४१.७३ अंश सेल्सिअस इतके आहे. परंतु यंदा एप्रिलमध्येच नाशिकचा पारा ४० पार गेल्याने नागरिक हैराण झाले आहे .नागरिकांना असाय उकाळा जाणवत असल्याने भर दुपारी घराबाहेर पडणे अशक्य झाले आहे. त्यातच सातत्याने चाळीशी पार होणाऱ्या विदर्भातील नागपूर ,वर्धा ,अकोला ,अमरावती, बुलढाणा, वाशिम, चंद्रपूर आणि गोंदिया या जिल्ह्याचा पारा सरासरी ४० ते ४५ च्या वर राहिला आहे. त्यात या आठ जिल्ह्यांच्या यादीत नाशिक जिल्ह्याचा समावेश होतो हे नाशिककरांसाठी गंभीर बाब आहे. या जिल्ह्यामध्ये पाण्याचे व्यवस्थापन, आरोग्याची काळजी कशी घ्यावी याविषयी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत मार्गदर्शन केले जाते, नाशिकचा पारा ४० अंश सेल्सिअस वर गेल्याने नागरिक आजारी पडू नये म्हणून काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागामार्फत केले जात आहे.

# शालेय प्राथमिक अभ्यासक्रमात मनुस्मृतीचा काही भाग असल्याचा पवारांचा आरोप, फडणवीसांचं आक्रमक प्रत्युत्तर

**नाशिक/प्रतिनिधि**

शालेय प्राथमिक अभ्यासक्रमाच्या आराखड्यात मनुस्मृतीचा उल्लेख असल्याच्या चर्चेने राजकीय वादंक निर्माण झाले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शरद चंद्र पवार यांना आज पत्रकार परिषदे दरम्यान याबाबतचा प्रश्न विचारण्यात आल्यानंतर त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली .शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी या संबंधी राज्य सरकारकडे भूमिका मांडली पाहिजे, असं मत व्यक्त केल, तर दुसरीकडे भाजप नेते आणि राज्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र हे आरोप निराधार असल्याचे सांगितले आहे. अभ्यासक्रमातील मनुस्मृतीच्या उल्लेखासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना शरद पवार म्हणाले की ही बाब माझ्याही वाचनात आली आहे .ज्या दोन-तीन गोष्टी आहेत त्यामध्ये मनुस्मृतिचा उल्लेख आहे. या गोष्टीबाबत शैक्षणिक क्षेत्रातील जे जाणकार आहेत त्यांनी विचार करावा आणि या संबंधीची आग्रही भूमिका सरकार समोर मांडावी , मात्र त्यांनी जर ही भूमिका घेतली नाही, तर प्राकृतिक विचारांच्या अनेक संस्था आहेत , त्या गप्प बसणार नाहीत असा अप्रत्यक्ष इशारा पवार यांनी दिला आहे.




मनुस्मृतीबाबत होत असलेल्या आरोपाचा देवेंद्र फडणवीस यांनी आक्रमक शब्दात प्रत्युत्तर देत, अलीकडच्या काळात आरोप करणाऱ्यांना काही उद्योग ऊरले नाहीत, वाटेल ते आरोप केले जात आहेत, महाराष्ट्रात वर्षानुवर्ष मनाचे श्लोक बोलले जातात, एकले जातात ,मात्र त्या गोष्टी अभ्यासक्रमात आहेत की नाही हे मी तपासले नाही .परंतु विनाकारण संभ्रम निर्माण करण्याचा जो प्रयत्न होतोय तो योग्य नाही. असं फडणवीस म्हणाले. दरम्यान या मुद्द्यावरून आगामी काळातील राजकीय नेत्यांमध्ये कलगी तुरा रंगण्याची शक्यता नाकारता येत नसून याबाबत नेमक्या काय घडामोडी घडतात हे मात्र महत्त्वाचे ठरणार आहे.

# परळीच्या तहसीलदारांना लोकसभा निवडणुकीत कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा भत्ता देण्यासाठी वेळ मिळेना

**प्रतिनिधि/ परळी वै.**

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना अनेक संकटांना सामोरे देत त्यांनी निवडणुका पार पाडल्या. बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील कर्मचाऱ्यांना मतदानाच्या ठिकाणीच त्यांचा जो भत्ता आहे, तो देण्यात आला. परंतु परळी तालुक्यातील तहसीलदारांना कर्मचाऱ्यांचा भत्ता देण्यासाठी आणखीनही वेळ मिळेना. काही कर्मचाऱ्यांनी निवडणुकीच्या दिवशीच तहसीलदारांना फोन करून भत्त्याविषयी विचारणा केली असता, त्यांनी दोन दिवस बँका बंद होत्या असे कारण दिले. दोन दिवसात आम्ही भत्ता तुमच्या खात्यावर पाठवू असं सांगितलं परंतु त्यानंतर पुन्हा संपर्क केला असता आठ दिवस लागतील याद्या करण्याचे काम सुरू आहे असेही सांगितलं. परंतु अद्याप पर्यंत भत्ता वाटप करण्यात आलेला नाही. तालुक्यातील इतर तालुक्यातील सर्व कर्मचाऱ्यांचा भत्ता मतदाना दिवशीच देण्यात आला. इतर जिल्ह्यातही मतदानाच्या दिवशीच कर्मचाऱ्यांचा भत्ता त्यांना नगदी देण्यात आला. मग परळीच्या तहसीलदारांना तो का देता आला नाही? असा प्रश्न पडणे साहजिकच आहे. परंतु एवढे दिवस होऊनही आणखीनही त्यांनी कर्मचाऱ्यांचा भत्ता त्यांच्या खात्यावर टाकलेला नाही. तेव्हा माननीय जिल्हाधिकारी श्रीमती दीपा मुधोळ मॅडम यांनी लक्ष घालून परळीच्या तहसीलदारांना कर्मचाऱ्यांचा भत्ता त्यांच्या खात्यावर लवकरात लवकर टाकण्यास सांगावे एवढीच कर्मचाऱ्यांची मागणी आहे.

परंतु बरबटलेले प्रशासन आणि राजकीय पुढार्यांचा दबाव यामुळेच गुन्हा दाखल होत नसल्याचा आरोप ठेवीदारांन कडून केला जात आहे. परिणामी आज पहाटे २.४७ वाजता विभीषण मानाजी तिडके राहणार नेहरू चौक यांच्या फिर्यादीवरून ७,५३,२९,९६८/- रकमेसाठी परळी शहर पोलीस ठाण्यात र नंबर ७४ / २०२४ दिनांक २४/५/२०२४ रोजी कलम ४०६, ४०९, ४२०, १२० बी, सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्था मधील हितसंबंधाचे संरक्षण) अधिनियम १९९९ कलम ३ नुसार चंदुलाल बियाणी यांच्यासह बालचंद्र लोढा, अभिषेक बियाणी, बद्रीनारायण बाहेती, प्रल्हाद अग्रवाल, विजय लड्डा, अशोक जाजू, सतीश सारडा, प्रेमलता बाहेती, कल्पना बियाणी, नामदेव रोडे, जगदीश बियाणी, व्ही बी कुलकर्णी, कांबळे मॅडम, गायकवाड, प्रदीप मुरकुटे, राजेश बचतर सोसायटीचे अधिकारी कर्मचारी यांनी विरोधात परळी शहर पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल झाला. ठेवीदारांच्या बर्याच प्रतीक्षेनंतर परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा तर दाखल झाला मात्र प्रत्यक्षात पोलीस आरोपीवर कधी कठोर कारवाई करतात याकडे ठेवीदारांचे लक्ष लागून आहे.

## दिंद्रुड चा सरपंच, भावाच्या संगनमताने पत्रकारावर गुंडांचा प्राणघातक हल्ला.!

माजलगाव. प्रतिनिधी- तालुक्यातील दिंद्रुड ग्रा.पं.चे सरपंच अजय कोमटवार व त्याचा भाऊ अमित कोमटवार यांच्या विरोधात बातम्या का लावतो म्हणत त्यांच्याच संगनमताने माजलगाव शहरातील गुंडां कडून दिंद्रुड येथील सा.दिव्या वार्ताचे पत्रकार सय्यद अखील मोहमद यांच्या वर लोखंडी रॉड, तलवारीने प्राण घातक हल्ला केल्याची घटना घडली.हल्ल्या प्रकरणी सय्यद अखील मोहमद यांनी २४मे रोजीच्या रात्री ९वा.माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार ते व त्यांचा मित्र सचिन गुलाबराव देशमाने रा.दिंद्रुड, ता.माजलगाव असे दोघ २०मे रोजीच्या दुपारी ४ते ४:३०वा.च्या सुमारास माजलगाव तहसिल कार्यालया कडे जात होते ते बायपास रोडवर असलेल्या पंचमुखी हनुमान मंदिरा समोर असताना त्यांच्या मोटार सायकल ला प्रकरणी आरोपी अविनाश गायकवाड (गब्बर) सोबत दोघे यांनी त्याची मोटार सायकल आडवी लावली. यानंतर अखील हे त्यांच्या मोटार सायकल वरुन खाली उतरले व म्हणाले की, मोटार सायकल आडवी का लावली असे म्हणताच अविनाश म्हणाला की, काय रे लय माजलास का,सरपंच अजय दिलीप कोमटवार व त्यांचा भाऊ अमित दिलीप कोमटवार यांच्या विरोधात बातम्या का छापतोच शिविगाळ करुन तुला जीवे मारुन टाकुत म्हणत मारहाण केली. दरम्यान मागुन प्रकरणातील तीघे अनओळखी आरोपी मोटार सायकल वरुन आले आणि त्यांनी अखील च्या डोक्यावर लोखंडी रॉड ने मारहाण करून गंभीर जखमी केले.

# शक्तीपीठ महामार्गास विरोध; बाधित शेतकरी संवाद यात्रेस मोठा पाठिंबा

**अंबाजोगाई/प्रतिनिधि**

अंबाजोगाई महामार्ग बाधित शेतकऱ्यांची एकजूट पवणार ते पत्रादेवी या शीघ्र द्द्तगती शक्तिपीठ महामार्ग मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यातून जात असून या महामार्गात अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी जात असल्याने शेतकरी भूमिहीन होणार असल्याने या महामार्गाविरोधात बाधित शेतकरी एकजूट होत असून प्रस्तावित महामार्गावरील अनेक गावांत शेतकरी संवाद यात्रा सुरू करण्यात आली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील गित्ता येथे संपन्न संवाद यात्रेत शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते शक्तीपीठ द्रुतगती महामार्गाच्या नावाखाली शेतकऱ्यांची सुपीक जमीन कवडीमोल भावात संपादित करून कॉर्पोरेट कंपन्यांच्या घशात घालण्याचे काम हे केंद्र आणि राज्य सरकार करत आहे. महामागपिक्षा मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष पूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न होण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या जमिनी विविध कारणांनी संपादित करून शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचे कट कारस्थान सरकार कडून सुरू आहे. शक्तिपीठ महामार्ग बाधित शेतकऱ्यांच्या हक्कासाठी अखिल भारतीय किसान सभा सदैव सोबत आहे नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातून शक्तीपीठ महामार्ग हा प्रस्तावित असून हा मार्ग अत्यन्त सुपीक आणि बागायती जमिनीतून जाणार आहे. त्यामुळे मराठवड्यातील खूप मोठी बागायत जमीन या महामार्गामध्ये जाऊन कायमस्वरूपी शेतकरी भूमिहीन होणार आहेत. यामुळे पवणार ते पत्रादेवी या शीघ्र द्द्तगती शक्तिपीठ महामार्गास शेतकरी विरोध करत आहेत. याच अनुषंगाने १३ एप्रिल २०२४ रोजी परळी येथे मराठवाड्यातील बाधित शेतकऱ्यांची विभागीय बैठक संपन्न झाली. या बैठकीत घेतलेल्या




निर्णयानुसार शक्तीपीठ महामार्ग बाधित शेतकरी संवाद यात्रा मागील ५ दिवसापासून सुरू करण्यात आली असून या संवाद यात्रेस शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. गुरुवार दि २३ रोजी ही संवाद यात्रा अंबाजोगाई तालुक्यातील गित्ता येथे पोहचली. या ठिकाणी परळी व अंबाजोगाई तालुक्यातील प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत असे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संवाद यात्रा प्रसंगी दासराव हांबर्डे (नांदेड), पोपटराव घाटूळ (परभणी), ॲड. गजेंद्र येळकर, कॉ. अजय बुरांडे (जिल्हा अध्यक्ष किसान सभा, बीड) रविंद्र देवरवाडे, प्रशान्त मस्के, चंदनशिवे सर, अशोक खामकर, बाबासाहेब यशवंत आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पिपळा गित्ता, गिरवली, भारज, सायगाव, नांदगाव, चाडगाव आदी गावातील बाधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

रविवार २६ मे २०२४






# पुणे हिट अँड रन प्रकरणानंतर शहरात मोठी कारवाई, तब्बल ४९ पब आणि बार सील

पुण्यातील कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर आता इतर पब आणि बार मालकांचे धाबे दणालले आहेत. कारण या अपघातानंतर काही पबमधील व्हिडीओ सोशल मीडियावर शेयर करण्यात आले होते. त्यामुळे पोलीस यंत्रणेवरही विरोधकांनी गंभीर आरोप केले. आता या अपघात प्रकरणानंतर राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील 49 पब आणि बारवर कारवाई कल्याणीनगर पुणे येथील अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाकडून मागील तीन दिवसात 14 पथकांमार्फत राबविण्यात




आलेल्या धडक मोहिमेत शहरातील तसेच जिल्ह्यातील 49 पब आणि बार वर कारवाई करत गुन्हे दाखल करण्यात आले असून ते बंद करून सील करण्यात आले आहे.याबाबतची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चरणसिंग राजपूत यांनी दिली.ल्याणी नगर येथील अपघातानंतर जवळपास 49 पब आणि बार वर कारवाई करण्यात आली आहे.या घटनेच्या पूर्वी देखील एप्रिल आणि मे महिन्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने 57 पब आणि बार वर कारवाई करण्यात आली होती. तसेच गेल्या वर्षभरात 257 ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे.तसेच या कारवाई मध्ये 1 कोटी 12 लाख रुपयांच दंड देखील वसूल करण्यात आलं आहे, असं चरणसिंग राजपूत म्हणाले. या कारवाई मध्ये पब आणि बार च्या वेळा, तसेच त्यांच्या प्रिमायसेस मध्ये काही बदल केला आहे का? तसेच रफटॉप बाबत आलेल्या तक्रारी, विना परवाना मद्य विक्री करणाऱ्या पब आणि बार वर कारवाई करण्यात येत असून ही कारवाई अशीच पुढे चालू राहणार असल्याचं यावेळी चरणसिंग राजपूत म्हणाले.

दरम्यान, या अपघातामुळे कोरेगाव पार्क परिसरात असे अनेक क्लब असल्याच्या पोस्ट सोशल मीडियावर फिरत आहेत. तर काही पब हे राजकारणातील नेत्यांच्या वरदहस्ताने सुरू असल्याच्या चर्चा दबक्या आवाजात सुरू आहेत. कारण पबमालक हप्ता देत असल्याने त्यांना भीती राहिली नाही, अशी टीकाही उघडपणे काही नेत्यांनी केलीये. मात्र आता राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाईचा धडाका लावल्याचं दिसत आहे.

## कोतन येथे मंगळवारी कोतुआई देवी यात्रा उत्सव

**प्रतिनिधि /पिंपळवंडी**




पाटोदा तालुक्यातील कोतन येथील भाविक-भक्तांचे श्रद्धास्थान व जागृत देवस्थान जगदंबा कोतुआई देवीचा प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दि.२८ मे २०२४ मंगळवार रोजी यात्रा उत्सव आयोजित केला असून या उत्सव सोहळ्याचा पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी बहुसंख्येने येऊन लाभ घ्यावा असे आवाहन कोतन ग्रामस्थांनी केले आहे.यानिमित्त देवीची पालखी मिरवणूक तसेच रात्री ९ नंतर शिव मल्हार जागरण पार्टी बारामती यांचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. दरम्यान पोलिसांच्या या कर्तबगारीचे शहरात कौतुक होत आहे.

## लोहा येथे आ. हंबर्डे यांच्या वाढदिवसानिमित्त फळे वाटप

**प्रतिनिधि/लोहा**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार मोहन अण्णा हंबर्डे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त लोहा काँगेस कमिटीच्या वतीने शासकीय रुग्णालय लोहा, व्यसनमुक्ती केंद्र, अनाथ आश्रम लोहा येथे बिस्किट व पाणी बॉटल वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी उपजिल्हा रुग्णालय लोहाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. जाधव साहेब, आमदार मोहन आण्णा हंबर्डे यांचे चिरंजीव राहुल हंबर्डे, काँग्रेस पक्षाचे




तालुका अध्यक्ष शरद पवार, , लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती आण्णासाहेब पाटील पवार यांच्या हस्ते फळे व बिस्किटे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजन लोहा काँग्रेस कमेटी यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी लोहा काँगेस कमेटीचे तालुका अध्यक्ष शरद पाटील पवार, राहुल भैया हंबर्डे, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती अण्णासाहेब पवार, संचालक दत्ता पा. दिघे, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष शरफोद्दीन शेख, माजी नगरसेवक अनिल दाढेल, सामाजिक कार्यकर्ते बालाजी जाधव, काँग्रेस शहर उपाध्यक्ष भुषण दमकोंडवार, उपाध्यक्ष अर्जुन महाबळे, सामाजिक कार्यकर्ते तुकाराम दाढेल, काँग्रेस शहर सचिव संजय पवार, चंद्रकांत घोंगडे, गणेश दाढेल, गजानन कळसकर, शहबाज शेख, अन्वर पठाण, वेदांत कोंडावार यासह लोहा शहर व तालुका काँग्रेस कमिटीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पैठण ते पंढरपुर राष्ट्रीय महामार्गाची दुरावस्था पालखीमार्ग नव्हे मोक्षमार्ग ; जन आंदोलनाचा ईशारा :-डॉ.गणेश ढवळे


पाटोदा:- बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातुन जाणारा जाणारा पैठण ते पंढरपुर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ एकुण ६७ किलोमीटर लांबीचा असुन आष्टी पाटोदा मतदान संघातुन जात असुन परळी येथील केशव आघाव यांच्या तिरूपती कन्स्ट्रक्शन मार्फत रस्त्याचे काम ४-५ वर्षांपासून सुरू असुन अजुनही पुर्णत्वास गेलेले नाही मात्र निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पाटोदा शहर ते घुमरा पारगाव दरम्यान रंदवेवस्ती याठिकाणी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भेगा पडलेल्या असुन दुचाकी वाहनांचे टायर भेगात अडकून वाहनचालकांचे नियंत्रण सुटल्याने अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे.या सुमार दर्जाच्या कामास जबाबदार कंत्राटदार तिरुपती कन्स्ट्रक्शन व या कामावर देखरेख करणारे अभियंते यांच्यावर दंडात्मक आणि प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, पाटोदा तालुका कार्याध्यक्ष पत्रकार शेख जावेद, तालुकाध्यक्ष हमीद खान पठाण यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत माजी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी व अरविंद काळे, प्रकल्प संचालक राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

पंकजाताईच्या ट्वीटमुळे नितिनजी गडकरी यांनी नविन रस्ता करण्याचे आदेश दिले होते :- डॉ.गणेश ढवळे

\- - -

पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे निकृष्ट कामामुळे पाटोदा तालुक्यातील अनपटवाडी येथील भेगा पडलेल्या रस्ताकामाची डॉ . गणेश ढवळे यांनी फोटो सहीत पोलखोल प्रसार माध्यमांमध्ये केल्यानंतर तेच फोटो माजी



ग्रामविकासमंत्री पंकजाताई मुंढे यांनी १८ सप्टेंबर २०२१ रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना " ट्वीट" केल्यानंतर त्याची तात्काळ दखल घेत कंत्राटदारावर कारवाईचे आदेश देत रस्ता फोडून नवीन करावा लागला होता. अर्धवट काम करुन कंत्राटदाराने पळ काढला ,रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी जन आंदोलनाचा इशारा :- राहुल जाधव, मुकुंद शिंदे

पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ आष्टी पाटोदा मतदार संघातून जात असुन एकुण ६७ किलोमीटरचे काम असुन परळी येथील तिरूपती कन्स्ट्रक्शन कडे काम असुन पाटोदा शहरातील राजमहंमद चौक येथील मांजरा नदीवरील पूल, चुंभळीफाटा, मळेकरवाडी येथील घाट, पारगाव, अनपटवाडी तसेच भीमनगर , येथील रस्ता आदि ठिकाणी वारंवार पाटोदकरांनी निवेदने तसेच रास्ता रोको आदि आंदोलनानंतर सूद्धा कोणतीही सुधारणा झाली नसुन कंत्राटदाराने रस्ता कामासाठीची संपूर्ण यंत्रसामग्री घेऊनच पळ काढला आहे त्यामुळे रखडलेले काम तातडीने पूर्ण करण्यात यावे यासाठी सामाजिक संघटना व सर्वपक्षीय जन आंदोलनाचा ईशारा राहुल जाधव (राष्ट्रीय काँग्रेस तालुकाध्यक्ष) आणि मुकुंद शिंदे (शिवसेना (उबाठा) तालुकाध्यक्ष यांनी दिला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com